Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-2 | Issue-8| Feb-2013 Available online at www.aygrt.isrj.org

साठोत्तरी मराठी साहित्याचे सांस्कृतिक पर्यावरण

सी. डी. □ंबळे

मराठी विभाग सी. बी. खेडगीज् कॉलेज अक्कलकोट , जि. सोलापूर.

सारांश — आधुनिक मराठी साहित्यामध्ये '□था' वाङ्मय प्रकाराचा प्रारंभ विसाव्या शतकाच्या सुरूवातीस झालेला दिसतो. या कालखंडातील व्यामिश्र स्वरूपाच्या सांस्कृतिक पर्यावरणाचा मराठी साहित्यातील सर्वच वाङ्मय प्रकारांवर जसा प्रभाव पडला आहे, तसाच '□था' वाङ्मयावरही प्रभाव पडलेला दिसतो. हे सांस्कृतिक पर्यावरण साहित्याच्या जडणघडणीला कारणीभूत असते. कोणत्याही काळाच्या वाङ्मयाचे स्वरूप पाहावयचे झाल्यास त्या काळातील वाङ्मयाचा निर्माता जो लेखक असतो, त्याच्या मनावर त्या काळात कोणते परिणाम झाले □वा संस□ार झाले, त्याने कोणत्या जीवनसृष्टीचा स्वीकार केला, त्याचे मन कोणत्या वातावरणात घडले इत्यादी घटकांचाही परिणाम सांस्कृतिक प्रभवातून निर्माण झालेला असतो.

प्रस्तावना-

उपरोक्त विवेचनासाठी साहित्य आणि संस्कृती यांचा अनुबंध तपासणे गरजेचे ठरते. साहित्य आणि संस्कृती यांचा अनुबंध तपासण्याआधी 'संस्कृती' म्हणजे काय? 'संस्कृती' शब्दाचा अर्थ याविषयी प्राधान्याने विचार करावा लागतो. '''□' म्हणजे करणे या धातुपासून बनलेला घ्कृतीङ या शब्दाला 'सम' हा उपसर्ग लागून 'संस्कृती' हा शब्द बनला आहे. प्रकृती म्हणजे स्वभावसिध्द निसर्ग, त्यात होणाऱ्या विकारांमुळे विकृती होते आणि ही विकृती न व्हावी म्हणून प्रकृतीवर संस्कार केल्यानंतर बनते ती 'संस्कृती'. संस्कृती ही संस्काराशी संबंधित असते.''[१] असा 'संस्कृती' शब्दाच्या अर्थाचा उल्लेख प्र.न.जोशी यांनी आपल्या ग्रंथात केला आहे.

''मनुष्य व्यक्तीशः आणि समुदायशः जी जीवनपध्दती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वतःवर व बाह्यविश्वावर संस्कार करून जो आविष्कार करतो, ती पध्दत वा आविष्कार म्हणजे संस्कृती.''[2] तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेल्या संस्कृतीविषयक विवेचनात जीवनपध्दती आणि संस्कार यांना महत्त्व दिलेले दिसते. तर्कतीर्थ जोशींच्या व्याख्येला अनुसरूनच प्र.न.जोशी यांनी संस्कृतीची व्याख्या केली आहे. ''मनुष्याच्या अंतर्बाह्य जीवनावर संस्कार करून त्यातील मलिनता, विकारवशता कमी केल्यामुळे व्यवस्थित संयमित आणि उन्नत झालेले जे आचारविचार त्यांनाच संस्कृती असे म्हणतात''[3] प्र.न. जोशी यांनी केलेल्या संस्कृतीविषयक विवेचनात संस्कार आणि आचारविचारांना महत्त्व देतात.

शं. दा. पेंडसे संस्कृतीच्या व्याख्येविषयी विवेचन करतात की, ''सुसंस्कृत समाजाचे उन्नत अंतरंग त्या समाजाच्या आध्यात्मिक, धार्मिक, नैतिक, शैक्षणिक विचार संपदेत, त्याच्या वैद्यकीय आणि राजकीय संस्थांत, त्याच्या शास्त्रीय आणि नाट्य, □ाव्य, □थादी वाङ्मयात त्याच्या चित्र, शिल्प, साहित्य, संगीतादी कलांत, त्याच्या अन्नवस्त्रात व ती मिळविण्याच्या साधनात, त्याच्या सुखाच्या, शुचितेच्या आणि सौंदर्याच्या कल्पनेत नानाविध स्वरूपांनी आविष्कृत झालेले दिसते. म्ह□ून या सर्वांचा समावेश

संस्कृतीत होतो.''[4] शं. दा. पेंडसे यांनी केलेल्या उपरोक्त विवेचनावरून संस्कृतीविषयक असलेली व्यापकता स्पष्ट होते. तसेच संस्कृतीविषयक व्याख्येत समाजातील अनेकविध घटकांचा समावेश प्रामुख्याने होताना दिसतो.

पु. ग. सहस्त्रबुध्दे संस्कृतीच्या व्याख्येविषयी म्हणतात, ''महाराष्ट्र संस्कृतीचा इतिहास म्हणजे, या भूमीत निर्माण झालेले वा रूढ झालेले धर्मशास्त्र, येथील तत्वज्ञान, राजपुरूषांनी अवलंबिलेली राजनीती, त्यांचे पराक्रम, त्यांची साम्राज्ये, येथे निर्माण झालेली भौतिकशास्त्रे, येथील साहित्यसृष्टी, कलासृष्टी एवढ्या व्यापक अर्थाने 'संस्कृती' हा शब्द येथे योजलेला आहे.''[5] पु. ग. सहस्त्रबुध्दे यांनी केलेली संस्कृतीविषयक व्याख्या शं. दा. पेंडसे यांनी केलेल्या व्याख्येशी मिळतीजुळती वाटत असली, तरी पेंडसे यांनी केलेली संस्कृतीची व्याख्या व्यापक स्वरूपाची दिसते. पु. ग. सहस्त्रबुध्दे यांनी संस्कृतीच्या व्याख्येविषयी विवेचन करताना त्यात कोणकोणते घटक अंतर्भूत असतात, त्याचाही ते उल्लेख करतात. ''मानवाची भौतिक व मनोमयसृष्टी म्हणजे संस्कृती. आध्यात्मिक आणि आधिभौतिक शक्तींना सामाजिक जीवनात उपयुक्त बनविण्याची शक्ती म्हणजे संस्कृती. राष्ट्रातील विद्वानांचे, ऋषींचे, धर्मज्ञानांचे विचार, त्यांची ध्येय, त्यांचे मार्ग व त्यांना अनुसरून राष्ट्रात झालेला आचार यांनी संस्कृती बनते.''[6] उपरोक्त विवचेनानुसार पु. ग. सहस्त्रबुध्दे यांनी संस्कृतीविषयक व्याख्या नेमकेपणाने मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

महादेवशास्त्री जोशी संस्कृतीविषयी म्हणतात, ''प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे त्यात होणारा बिघाड आणि संस्कृती म्हणजे त्या प्रकृतीत विकार किंवा बिघाड होऊ नये या उद्देशाने तिच्यावर करावयाचे सम्यक संस्कार होय''[७] महादेवशास्त्री जोशी यांनी संस्कृतीचा अर्थ केवळ संस्कारापुरताच मर्यादित स्वरूपात प्रकट केलेला दिसतो.

मराठी साहित्यातील सांस्कृतिक पर्यावरण अभ्यासताना प्रामुख्याने संस्कृती शब्दाचा अर्थ, संस्कृती म्हणजे काय ? याविषयी काही तज्ज्ञांच्या व्याख्यांचा उल्लेख उपरोक्त विवेचनानुसार करण्यात आला आहे. 'संस्कृती' ही संज्ञा तशी व्यापक स्वरूपाची असलेली दिसते. 'मानवाच्या अंतर्बाह्य जीवनावर भौतिक सृष्टीने केलेले संस्कारित विचार म्हणजे संस्कृती' अशी व्याख्या करता येईल. वरील सर्व संस्कृतीविषयक व्याख्यांचा परामर्श घेताना विविध घटकांचा समावेश झालेला दिसतो. संस्कृतीमध्ये मनोमयसृष्टी आणि भौतिकसृष्टी यांचा समावेश होतो. यामध्ये व्यक्ती आणि निसर्ग, व्यक्ती, समूह आणि गट यांसारख्या विविध घटकांचाही विचार केला जातो.

साहित्य आणि संस्कृती अनुबंध :

उपरोक्त सांस्कृतिक घटकातून निर्माण होणाऱ्या पर्यावरणाचा साहित्य निर्मितीवर प्रभाव पडतो. साहित्य निर्मितीही याच समाज संस्कारातून विकसित होत गेलेली असते. साहित्य हा संस्कृतीचा घटक म्हणून जशी काही मीमांसा करता येते. संस्कृती ही साहित्याचा एक घटक म्हणून विचार करणे शक्य असते. तसेच साहित्य हा संस्कृतीचा घटक असतो. याचा अर्थ साहित्यातून समाजाचे आणि संस्कृतीचे रूप व्यक्त होते. समाजाचे व संस्कृतीचे केवळ बाह्यरूपच नव्हे तर त्याच्या अंतर्यामी असलेल्या विशिष्ट समूहमनातील प्रेरणा, प्रवृत्ती आणि परंपरा यादेखील साहित्यातून व्यक्त होताना दिसतात.

रा. ग. जाधव साहित्य आणि संस्कृतीच्या संदर्भात म्हणतात, ''साहित्य आणि संस्कृतीचा प्रभाव, अभ्यास व संस्कार यांनी घडविलेली साहित्यविषयक रसिकता, अभिरूची हा घटक साहित्यिक व वाचक या दोहोंचा समान घटक असतो. यादृष्टीने साहित्याची प्रवृत्ती, साहित्यिक वाचक व रसिकता यांना प्राधान्य देऊन त्यांच्यातील किंवा त्यांच्या रूपाने जे सांस्कृतिक भाष्य सूचित किंवा प्रकट झालेले असते, त्याची मीमांसा केल्यास ते साहित्य हे संस्कृतीचा घटक म्हणून केलेली मीमांसा ठरेल.''[८] उपरोक्त विधनाला अधिक स्पष्ट करण्यासाठी रा. ग. जाधव म्हणतात. ''संस्कृती ही साहित्याचा घटक असते, असे मानून मीमांसा करणारे अभ्यासक विविध क्षेत्रांत संभावतात. धर्मसमाज, राजनीती, अर्थस्थिती, विज्ञान, तत्वज्ञान इ. क्षेत्रात काम करणाऱ्या विशेष ज्ञा-नाचा, साहित्याचा परामर्श घेण्याची गरज आहे. समाजाचा किंवा संस्कृतीचा समग्रपणे किंवा सर्वांगीण वेध घ्यावयाचा असेल, तर समाजाची सर्जनशक्ती ज्याच्या रूपाने प्रकट होते, ती ती रूपे विचारात घेणे आवश्यक असतात. म्हणूनच धर्मग्रंथापासून राजनीती ग्रंथापर्यंत लेखक आणि साहित्य यांची दखल घेतली जाते असे दिसून येते.''[९] उपरोक्त विवेचनावरून साहित्य आणि संस्कृती हे दोन्ही घटक एकमेकांना पूरक असलेली दिसून येतात.

साहित्य आणि संस्कृती यांच्या संबंधाविषयी रा. ग. जाधव म्हणतात, ''चांगले साहित्य संस्कृतीला चांगुलपणा आणते आणि साहित्याच्या चांगुलपणाचा परिपोष संस्कृतीचा करीत असते. असे हे साहित्य-संस्कृतीचे आगळे वेगळे द्वंद्व आहे. ते आपण समाजवून घेणे हा साहित्याच्या सांस्कृतिक अभ्यासाचा हेतू आहे. ''[१०] साहित्य आणि संस्कृती यांच्या अनुबंधनातून वाङ्मयीन संस्कृती अस्तित्वात येते. साहित्य हा मानवी भावभावनांचा आविष्कार असतो. एखाद्या व्यक्तीने निर्माण केलेल्या साहित्यकृतीमध्ये त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाबरोबरच इतरही अनेक गोष्टींचे प्रतिबिंब दिसून येते. संस्कृती ही एक विशिष्ट समाजाची असते आणि साहित्य निर्माण करणारी व्यक्ती त्या समाजाचा एक घटक असतो, तेव्हा या ठिकाणी समाज, साहित्य आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबध असलेला दिसतो.

साहित्य आणि संस्कृती यांच्यामधील परस्पर संबंध स्पष्ट करताना सदा कऱ्हाडे म्हणतात, घ्मानवी समाजात संस्कृतीचे महत्व आहे. संस्कृती जोपासावी लागते. जोपासताना तिचे संवर्धन होते. साहित्य हे संस्कृतीची जोपासना व रक्षण करण्याचे कार्य करीत असते. साहित्याचा समाजाशी नि संस्कृतीशी असलेला संबंध लक्षात घेताना बहुदा असा एक युक्तिवाद केला जातो की, हे संबंध लक्षात घेऊन साहित्य निर्मिती होते, तेव्हा साहित्यात सामाजिक व सांस्कृति परिस्थितीवरच्या वैचारिक भाष्याला प्राधान्य दिले जाते.''[११] उपरोक्त विधानाला विस्तृत करण्यासाठी सदा कऱ्हाडे म्हणतात, ''साहित्य हा मानवी समाजातील जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे. म्हणून साहित्याचा समाजाशी आणि संस्कृतीशी संबंध असतो. हा गृहीतपक्ष स्वीकारणे अन्वर्थ आहे. हे संबंध तपासून पाहताना हा गृहीतपक्ष भक्कत होईल अथवा या गृहीतपक्षाच्या मर्यादा स्पष्ट होतील अथवा गृहीतपक्ष चुकीचा ठरेल. यातील तिसरी शक्यताही नाकारावी लागते. कारण साहित्य हे संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन करते. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही आणि साहित्यांतर्गत ज्ञानक्रियेमुळे साहित्य हे सामाजिक ज्ञानाचे साधन आहे, ही वस्तुस्थिती स्वीकारावी लागते.''[१२] सदा कऱ्हाडे यांच्य उपरोक्त विवेचनानुसार साहित्य हे संस्कृतीशी आणि संस्कृती ही साहित्याशी निगडित असते. साहित्यातून समाजाच्या व संस्कृतीच्या बाह्यरूपांबरोबर त्यांचे अंतररूपही प्रत्ययास येते. साहित्यिक हा समाज व संस्कृतीशी असलेल्या संबंधातूनच साहित्यकृती निर्माण करीत असतो. सर्जनशतील संस्कृतीसाठी धर्मसमाज, राजीनीती, अर्थस्थिती, विज्ञान, तत्वज्ञान यांच्याबरोबर लेखक आणि त्यांचे साहित्यही तेवढ्याच प्रमाणात कारणीभूत असते. एखाद्या समाजाचे किंवा संस्कृतीचे संवर्धन हे तत्कालीन साहित्यिकाच्या साहित्य निर्मितीवर अवलंबून असते. उपरोक्त सर्व विवेचनांचा परामर्श घेतल्यास साहित्य आणि संस्कृतीचा अनुबंध स्पष्ट होताना दिसतो.

साठोत्तरी सांस्कृतिक पर्यावरणाची संकल्पना :

नैसर्गिक पर्यावरणामध्ये मानवाचा समावेश झाल्यास त्यातून सांस्कृतिक पर्यावरण तयार होते. 'No men is alike' कोणताही माणूस दुसऱ्या माणसासारखा नसतो. याचा अर्थ एकाच पर्यावरणामध्ये राहणारे इतर सर्व प्राणी समान प्रमाणात जीवन जगतात; पण मानवाबद्दल तसे म्हणता येणार नाही. आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक इ. सर्व मानवनिर्मित घटकांमध्ये तफावत असलेली दिसून येते. पर्यावरणाचा मानवी संस्कृतीच्या जडणघडणीत मोठा वाटा असतो. हे आता सर्वमान्य झालेले दिसून येते. त्यातूनच 'सांस्कृतिक पर्यावरणाङ ची एक उपशाखा निर्माण झालेली आहे. निसर्गजात पर्यावरण व मानवाने त्याचे केलेले संस्कृतिकरण यांचे व्यापक संवेदन निर्माण झाले. त्यामुळे सजीव व निर्जीव अशा संवेध सृष्टी जातीचा आशय व आकलन विस्तृत होऊ लागले. एकूणच विचार व्यवहाराचे क्षेत्र व्यापक होत गेल्याने सांस्कृतिक पर्यावरणाची संकल्पना अशा या पार्श्वभूमीतून पुढे आलेली आहे. 'परिस्थिती विज्ञानाङ सारखीच ही संकल्पना १९६० नंतरच्या कालखंडातीलच पण एक प्रभावी संकल्पना आहे.

सांस्कृतिक पर्यावरणांची संकल्पना युरोपीयन संस्कृतीतूनच उदयाला आली असली, तरी या संकल्पनेचा पूर्वेतिहास अजूनही अज्ञात असलेला दिसतो. तरीही युरोपीयन विचारक्षेत्रात त्यांचे संशोधन चालू आहे. ते यथाकाल प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या पुराव्यासकट पुढे येईल. खरा प्रश्न असा आहे की, सांस्कृतिक पर्यावरणाची युरोपीयन संकल्पना इतर कोणालाही उद्बोधक व अर्थपूर्ण ठरणार नाही. या संकल्पनेची तात्विक चौकट युरोपीयांना उपलब्ध करून दिली असली, तरीही या चौकटीला आशयाचे स्वरूप प्रत्येक संस्कृतीला आपापल्या इतिहासानुसार निश्चित करावी लागेल. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीत, सांस्कृतिक जडणघडणीत विशिष्ट इतिहास, भूगोल महत्त्वाचे घटक ठरतात.

रा. ग. जाधव सांस्कृतिक पर्यावरणाच्या संकल्पनेच्या आरंभाविषयी विवेचन करतात, छ्पर्यावरण हे संस्कृतीला घडविते की संस्कृती पर्यावरणाला घडविते, बदल किंवा परिवर्तन याबाबतीत संस्कृती व पर्यावरण यांच्यात जो कार्यकारणभाव संभावतो किंवा गृहीत धरला जातो, तो कार्यकारणभाव कोणत्या अर्थाचा असतो हे किंवा ह्यासारखे प्रश्न प्रथम पुढे करण्यात आले. डार्विनच्या क्रमविकासवादाची किंवा उत्क्रांतवादाची उत्पत्ती १९०९ साली प्रसिध्द झालेल्या त्यांच्या 'ओरिजन ऑफ स्पिशीजङ या ग्रंथातून जगास परिचित झाली. सजीवांची उत्क्रांती व पर्यावरण याविषयी नवे व्यापक ज्ञान त्यातून प्राप्त झाले.''[१३] रा.ग.जाधव यांच्या मते, डार्विन यांनी 'ओरिजन ऑफ स्पिशीज' या ग्रंथातून प्रथमतः पर्यावरण या संज्ञेविषयी मांडणी केलेली दिसून येते.

''सांस्कृतिक पर्यावरणाची आता रूढ झालेली संकल्पना ही वेगळी आहे. मुख्यतः ती सजीव व त्याचा नैसर्गिक परिसर किंवा अधिवास त्यांच्या एकात्मेवर आधिष्ठित आहे. परस्परांच्या अस्तित्वाला पोषक ठरणारे जीवशास्त्रीय नाते त्या दोहोंत असल्याचे भान या नव्या संकल्पनेत आहे. भेदातील अभेद, अभेदातील भेद असे काही परस्परसापेक्ष हितसंबंध सजीव व त्याचा भौतिक आधिवास यांच्यात असल्याचे भान झाले आहे.छ[१४] रा. ग. जाधवांनी सांस्कृतिक पर्यावरणाची आधुनिक काळातील रूढ झालेली वेगळी संकल्पना उपरोक्त विवेचनातून स्पष्ट केलेली दिसते. सांस्कृतिक पर्यावरणासाठी सजीव व त्याचा नैसर्गिक परिसर महत्त्वाचा असतो.

सांस्कृतिक पर्यावरणाच्या बदलाच्या संदर्भात रा. ग. जाधव म्हणतात, च्आधुनिक समाज वैज्ञानि□ांनी या दृष्टीने सांस्कृतिक पर्यावरणाच्या संकल्पनेची काही एक स्पष्टीकरणात्मक मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. विशिष्ट समाजतील जीवनमूल्ये व जीवनमूल्यविषयक धारणा व्यक्तीच्या सामाजिक संबंधामागील उद्दिष्टे व प्रेरणा व्यक्तिमत्वाच्या घडणीची समाजातील जैविक व सामाजिक प्रक्रिया यांसारख्या बाबींचा विचार सांस्कृतिक पर्यावरणाच्या संदर्भात करण्यात येतो. व्यक्ती समष्टी व नैसर्गिक परिसर यांच्या संबंधाचे स्वरूप अनेक प्रकारच्या विशिष्ट आदानप्रदान पध्दतीने निश्चित होते आणि या विशिष्ट आदानप्रदान पध्दतीपैकी कोणत्याही एका पध्दतीत निर्माण होणाऱ्या बदलांमुळे सांस्कृतिक बदल घडून येतात.''[१५] आधुनिक समाजवैज्ञानिकांची सांस्कृतिक पर्यावरणाच्या संकल्पनेविषयीची भूमिका उपरोक्त विवेचनानुसार प्रत्ययास येते.

छ्वाङ्मय क्षेत्रातील घडामोडी या पर्यायाने सांस्कृतिक क्षेत्रातील असतात. कारण त्याचा परिणाम एकंदर सांस्कृतिक पर्यावरणावरच होत असतो आणि म्हणूनच साहित्य व्यवहाराला सांस्कृतिक व्यवहाराचे एक अविभाज्य अंग मानावे लागते. साहित्य हे सांस्कृतिक परंपरा आणि मूल्ये यांचे संरक्षण, संक्रमण आणि संवर्धन इतर सर्जनशील घटकांपेक्षा अधिक व्यापक प्रमाणात करते. साहित्य हे सांस्कृतिक संचितही असते आणि सांस्कृतिक संचिताचा कोशही असतो.''[१६] जनार्दन वाघमारे यांच्या उपरोक्त विवेचनावरून वाङ्मयाचे सांस्कृतिक क्षेत्रातील महत्त्व स्पष्ट होताना दिसते. तसेच साहित्य आणि सांस्कृतिक व्यवहारात अनुबंध प्रत्ययास येतो. सांस्कृतिक पर्यावरणाची संकल्पना १९६० नंतर कशी विकसित व समृध्द होत गेली आहे त्याची प्रचिती उपरोक्त विवेचनावरून येते.

साहित्यातील सांस्कृतिक विचार आणि महत्त्वाच्या घटना :

साठोत्तरी सांस्कृतिक पर्यावरणची संकल्पना उपरोक्त क्रमांनी अभ्यासल्यानंतर साहित्यातील सांस्कृतिक विचार आणि महत्त्वाच्या घटनांचा प्रभाव तपासणे गरजेचे ठरेल. मराठीतील संत साहित्य हे मध्ययुगीन सांस्कृतिक चळवळीचे एक अंग होते. विविध पंथोपंथाच्या संत मंडळींनी व समर्थकांनी साहित्यनिर्मिती हे सांस्कृतिक पुनर्रचनेचे एक कार्य मानले. मराठी पंडिती काव्यप्रवाह हा अधिक कलावादी संप्रदाय होताष तर शाहिरी काव्य हे जनसामान्यांचे होते. आधुनिक सामाजिक सुधारणावादी चळवळी, बहुजन समाजाच्या सत्यशोधक चळवळी, राजकीय स्वातंत्र्यवादी चळवळी, गांधीवादी, मार्क्सवाद यांसारख्या नानाविध चळवळींचे साहित्य स्वातंत्र्यपूर्व काळात मराठीत निर्माण झाले. एका दृष्टीने या सर्व सांस्कृतिक चळवळी होत्या. दोन-अडीच तपाच्या कालावधीत दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य इ. प्रवाहांना पुरस्कृत करणाऱ्या प्रभावी चळवळी या सांस्कृतिक स्वरूपाच्या असलेल्या दिसून येतात.

ब्रिटिश काळात पश्चिम महाराष्ट्रातील मुंबई, पुणे ही शहरे सांस्कृतिक पर्यावरणाच्या चळवळीची प्रमुख केंद्रे होती. आंग्ल ब्राह्मणी, आंग्ल बहुजनी समाजी अशा दोन प्रकारच्या आधुनिकीकरणाच्या व सांस्कृतिक पर्यावरणाच्या धारा या केंद्रातून सुरू झालेल्या दिसतात. पश्चिमी संस्कतीचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे पश्चिमी युरोपीयन ब्रिटिश संस्कृती व दुसरी म्हणजे

पश्चिमी महाराष्ट्राची पुण्या-मुंबईची संस्कृती. या सांस्कृतिक तफावतीचा परिवर्तनाच्या प्रक्रियेस फायदाच झालेला दिसतो. विषम सांस्कृतिक पर्यावरणाला शह देण्यासाठी अनेक प्रकारच्या सांस्कृतिक आणि वाङ्मयीन संस्था, संघटना हळूहळू राष्ट्रभर निर्माण होत गेल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक भाषिक राज्यनिर्मितीच्या पोटात यांसारख्या सांस्कृतिक जाणिवांची स्पंदने होती. ती कमी अधिक प्रमाणात व्यक्त होत गेल्याचे दिसते. महाराष्ट्रातील स्वातंत्र्योत्तर राजकारणावर या प्रदेशाविशिष्ट असमानतेचा अधिक परिणाम झाल्याचे व तो टिकून राहिल्याचेही दिसून येते.

कायद्याने आणि शासन-सत्तेने सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन घडून येत नसते. चळवळी, सत्याग्रह, निषेध, निदर्शने, मोर्चे, संप, हरताळ यांची कास धरणे भागच पडते म्हणजे भौतिक, आर्थिक, राजकीय बदल हे सांस्कृतिक परिवर्तनास आवश्यक व उपयुक्त ठरतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील चळवळीच्या संदर्भात रा. ग. जाधव म्हणतात, ''या विशाल राज्याची स्थापना हेच स्वातंत्र्योत्तर काळातील आद्य व मूलगामी स्वरूपाचे सांस्कृतिक परिवर्तन होय. प्रादेशिक असमतोलाच्या निवारणासाठीही इथे राजकीय आंदालेने नंतर करावी लागली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर लगेचच निर्माण झालेल्या साहित्य सांस्कृतिक मंडळाजवळ काही ठोस सांस्कृतिक धोरण होते, असे मुळीच वाटत नाही. त्यातल्या त्यात समग्र फुले वाङ्मयाच्या प्रकाशनाचा शासकीय प्रकल्प परिणामकारक ठरला.''[१७] साहित्य सांस्कृतिक मंडळाला 'समग्र महात्मा फुलेङ वाङ्मयाचे प्रकाशन करण्यामागे सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात जागृती अभिप्रेत होती हे रा. ग. जाधवांनी केलेल्या उपरोक्त विवेचनावरून स्पष्ट होते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील काही घटना सांस्कृतिक पर्यावरणाच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरणाऱ्या आहेत. त्यापैकी एक घटना म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात साने गुरूजींनी केलेले पंढरपुरच्या विठ्ठल मंदिराचे आंदोलन. हा सत्याग्रह यशस्वी झाला. पंढरीचा विठ्ठल आणि विठ्ठल मंदिर हे महाराष्ट्रातील आद्य सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रतीक होते. सांस्कृतिक परिवर्तनाच्या गतीच्या संदर्भात रा. ग. जाधव म्हणतात, च्सांस्कृतिक परिवर्तनाची गती सरळ रेषेतील नसते. तर ती बरोबर मागेपुढे होणारी असते. या वस्तुस्थितीचे अधोरेखन गांधी हत्येनंतर महाराष्ट्रातील ब्राह्मणांविरोधी दंगलीने केले. या प्रकाराचा अस्वस्थ करणारा प्रश्न परिणामतः मराठी विचारवंतांना त्रस्त करू लागला. या प्रकारचे अनपेक्षित तत्कालीन हिंसक उद्रेक हे सर्वच परिवर्तनवादी चळवळीच्या नशिबी असतात, हे ही एक ऐतिहासिक सत्य आहे.''[१८] महात्मा गांधींच्या हत्येनंतर ब्राह्मणांची अनेक घरे जाळण्यात आली. या हिंसक उद्रेकातून सांस्कृतिक परिवर्तनाचा व प्रबोधनाचा पराभव सूचित होतो का ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. सांस्कृतिक परिवर्तनाचे बळ समाजाच्या दृढ संकल्पशक्तीत असलेले दिसते. गांधी हत्येनंतर व्यंकटेश माडगूळकरांनी घ्वावटळ्ह ही कादंबरी लिहिली. तत्कालीन सामाजिक, राजकीय क्षेत्रामध्ये निर्माण झालेली विपरीत परिस्थिती, समाजाची मानसिकता, समाजातील ताणतणाव, संघर्ष कशारीतीने विकोपाला गेलेला होता त्याचे वास्तवदर्शन या कलाकृतीतून प्रत्यास येते.

रा. ग. जाधव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धर्मांतराविषयी म्हणतात, च्स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू केलेली डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलितांची चळवळ ही अस्सल मातीतून वर आलेली होती. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पर्वातील (१९४७-१९६०) डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर आणि बौध्द धर्माचा प्रसार ही सांस्कृतिक दृष्टीने महत्वाची घटना होय.च[१९] डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांच्या दृष्टीने या घटनेचे सांस्कृतिक महत्त्व व अर्थ स्पष्ट असले, तरी त्या बाहेरील व्यापक मराठी समाजाच्या दृष्टीने या घटनेचे महत्त्व व मर्मही स्पष्ट झालेले दिसत नाही. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामागोमाग महाराष्ट्रातील खेडोपाडी दलितांवरील अत्याचार वाढले. मंडल आयोगाच्या शिफारशी तसेच राखीव जागा यांच्या अनुषंगाने गुजरातमध्ये व इतर दलितांविरूध्द दंगली झाल्या. आंबेडकरांच्या ध्धर्मांतरङ या घटनेचा परिणाम दलितांना कसा भोगावा लागला, त्याचे विवेचन उपरोक्त घटनेतून प्रत्ययास येतेष तसेच डॉ. आंबेडकरांना बदनाम करणारी मोहीमच जणू सुरू झाली. दलित समाज तरीही अधिक चैतन्यशील बनला. शहरे, शिक्षण यांकडे वळून तो परंपरागत ग्रामव्यवस्थेपासून दूर जाण्यचा प्रयत्न करू लागला. या नव्या परिवर्तनशील चैतन्याचा लढावू आविष्कार सत्तरीच्या दशकात 'दलित पँथरङ च्या रूपाने झालेला दिसतो.

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचे स्थूलमानाने सामाजिक संदर्भ घेणे येथे अधिक उचित ठरेल. १९५० च्या दशकाच्या शेवटी शेवटी मराठी लघुनियतकालकांची आणि अनियतकालिकांची चळवळ उदयाला आली. 'शब्द', 'अर्थवङ, 'असोङ, घ्येरू', घ्वाचा', 'अबकडई' आणि 'त्रिशंकूङ यांसारख्या लघुपत्रिकांनी या चळवळींना चालू ठेवले. प्रस्थापितांचा प्रतिकार एवढीच प्रेरणा स्वातंत्र्योत्तर साहित्यामागे नव्हती तर शिक्षणचा प्रसार, पेपर, बँक, पुस्तकांची उपलब्धता, उपेक्षित वर्गाच्या जागृत झालेल्या सांस्कृतिक आकांक्षा, वाङ्मयीन अभिरूचीतील बदल आणि व्यापक मराठी भाषिक समाजाचे असलेले भान आणि या

नव्या सांस्कृतिक, शैक्षणिक, वाङ्मयीन वास्तवाला प्रतिसाद देण्याची प्रवृत्तीच हीच स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यामागील खरी परिवर्तनशीलता प्रेरणा होती. याच सुमारास मिलिंद महाविद्यालयाच्या परिसरात 'अस्मिता' नंतरच्या कालावधीत 'अस्मितादर्श' च्या रूपाने दलित साहित्याची विद्रोही चळवळ उदयाला आली. पुढे ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य व अलीकडच्या काळात मुस्लीम मराठी साहित्य, ख्रिस्ती मराठी साहित्य यांसारख्या चळवळी उदयाला आलेल्या दिसून येतात. उपरोक्त चळवळींपैकी दलित साहित्याच्या संदर्भात रा. ग. जाधव लिहितात, ''दलित साहित्याची चळवळ ही केवळ साहित्य परिवर्तनाची चळवळ नव्हती तर ती सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ होती.''[२०] उपरोक्त विवेचनारून दलित साहित्याच्या चळवळीचे वेगळेपण व सांस्कृतिक परिवर्तनातील महत्त्वपूर्ण योगदान स्पष्ट होते.

च्सांस्कृतिक परिवर्तनाच्या स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनीही 'नव वाङ्मयीन पत्रकारिता' या प्रकारात मोडणारे परिवर्तनलक्षी वर्णन केले आहे. यात नरेंद्र दाभोळकर, अनिल अवचट, विनय हर्डीकर, जगदीश गोडबोले इ. चे अनुभवदर्शी लेखन महत्त्वाचे आहे. 'साधना', 'माणूस' यांसारख्या नियतकालिकांनी साठोत्तरी कालखंडातील मराठीतील विकास पत्रकारितेची एक चांगली परंपरा चालू केली आहे.च[२१] असा तपशील रा. ग. जाधवांच्या ग्रंथात पाहावयास मिळतो. सांस्कृतिक परिवर्तनाच्या स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे साठोत्तरी कालखंडातील मराठी पत्रकारतेतील महत्वपूर्ण योगदान उपरोक्त विवेचनावरून स्पष्ट होते.

संयुक्त महाराष्ट्रातील आंदोलन हे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सर्वात मोठे व महत्वाचे आंदोलन. या आंदोलनानंतर महाराष्ट्रव्यापी आंदोलन पाहावयास मिळत नाही. संपूर्ण मराठा समाज तथा साहित्यिक या आंदोलनात सहभागी झाले होते. यावरून हे मराठी जनतेचे आंदालेन होते असेच म्हणता येईल.

महाराष्ट्रात नेहमी कोणत्या ना कोणत्या चळवळी होत राहिल्या. सबंध महाराष्ट्रीय समाज ढवळून काढणाऱ्या चळवळींमध्ये गोवा, संयुक्त महाराष्ट्र, ग्रामीण नेतृत्व उदय, आणीबाणी, नामांतर आणि शेतकरी लढा इ. चळवळींचा उल्लेख केला जातो. पन्नालाल सुराणा यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय धोरणाविषयी विवेचन करतात, च्यशवंतराव चव्हाणांनी रिपब्लिकन पक्षाशी १९६२ साली समझोता करून शिवशक्ती व भिमशक्ती यांचा मिलाफ झाल्याची घोषणा केली. पुढे सामाजिक समतेपेक्षा सत्ताकांक्षा प्रभावी ठरल्याने ही प्रक्रिया खंडित झाली. सामाजिक अभिसरणाची संधी पुन्हा महाराष्ट्राने गमावली. यशवंतराव त्याकडे सत्तेचे गणित म्हणूनच पाहत होते. त्यानंतर महत्त्वाच्या दोन घटना घडल्या. दलित साहित्याच्या चळवळीने तर सबंध महाराष्ट्र ढवळून निघाला. सहाव्या दशकात नामदेव ढसाळांचे 'गोलपिठा', दया पवारांचे 'बलुतं', उत्तम तुपेंचे 'झुलवा' येथपर्यंत दलित साहित्याची प्रचंड लाट निर्माण झाली. आणि तळागाळातही जाणीव जागृती झाल्याची जबरदस्त भावना सर्व समाजभर पसरली.''[२२] यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय स्वार्थी धोरणामुळेच तत्कालीन दलित समाजात असंतोष पसरलेला दिसतो. परिणामी अशा परिस्थितीत दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांशी साहित्याच्या माधमातून केलेला आत्माविष्कार दलित साहित्याच्या रूपाने पुढे आलेला दिसतो.

पंडित नेहरुंच्या निधनानंतर या समाजात अनेकविध सांस्कृतिक चळवळींची निर्मिती झालेली दिसते. नेहरू युगानंतरच्या सामाजिक परिस्थितीची जाणीव करून देताना रा. ग. जाधव विवेचन करतात, च्स्वातंत्र्योत्तर कालखंडाती सांस्कृतिक परिवर्तनाच्या दोन प्रमुख आघाड्या होत्या. पहिली आघाडी शासकीय, शासकीय उपक्रम, आंदोलने, निदर्शने इ. ची यासंदर्भात एक उल्लेखनीय गोष्ट आहे की, नेहरू युगाच्या समाप्तीबरोबर (१९६४) स्वातंत्र्याचे एक स्वप्नपर्व ठरले. १९७२ मधील भीषण मधील दुष्काळाने या भ्रमनिराशाची तीव्रता अधिकच वाढली आणि बांगला मुक्तियुध्दातील यशाची, सुखची भ्रांतीही नष्ट झाली. मात्र याच कालखंडात स्वयंसेवी क्षेत्रातील परिवर्तनाच्या चळवळींना मोठीच चालना मिळाली होती. नेहरूयुग हे आंतरराष्ट्रीयाच्या मोहक जाणिवेचे व इर्षेचे पर्व होते. चीन आक्रमणानंतरच हे पर्व भंगू लागले होते. नेहरू प्रभावित तरूण नेहरू निधनानंतरच मग आपल्या देशाकडे वा देशीवादाकडे वळले. स्वयंसेवी चळवळींना यातूनच बळ प्राप्त झाले. परिणामतः रिपब्लिकन पक्षातर्फे देशभर सरकारी जमिनीवरील सत्याग्रह करण्यात आले आणि समाजवादी पक्षातर्फे जमीन बळकाव मोहीम हाती घेण्यात आली. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या चळवळी, एक गाव एक पानवठा ही चळवळ, दलित पँथर्स, देवदासी पुनर्वसन, शेतकरी संघटनेची स्थापना, लहानमोठ्या विद्यार्थी संघटना, मुस्लीम सत्यशोधक संघटनेची स्थापना, स्त्री मुक्ती आंदोलने, ग्रामायणाची चळवळ, युवक क्रांतिदल, अंधश्रध्दा निर्मूलनाची मोहीम, भ्रष्टाचारविरूध्द कारवाया यांसारख्या आंदोलनाचे जोरदार कृतिपर्व नेहरू युगानंतरच उदयाला आले.''[२३] तत्कालीन समाजात निर्माण झालेल्या विविध चळवळींच्या मुळाशी विविध

प्रकारच्या विचारप्रणाली असल्या, तरी त्यांचे लक्ष हे प्रामुख्याने सांस्कृतिक परिवर्तनाचेच होते. शिक्षण, शिक्षण संस्था, पत्रव्यवहाराद्वारे व बहिःस्थ परीक्षा पध्दती, मुक्त विद्यपीठ इत्यादींचा मोठ्या प्रमाणात झालेला विस्तार या गोष्टी स्वातंत्र्योत्तर काळातील सांस्कृतिक परिवर्तनाचे द्योतकही आहे आणि कारकही आहेत.

नेहरू युगाच्या समाप्तीनंतर म्हणजे सर्वसाधारणपणे १९६०-८० या दोन दशकाच्या कालखंडातील काही परिवर्तन उमाळ्याचा मागोवा घेणे उद्बोधक ठरेल. १९६७ मध्ये उदयाला आलेल्या युवक क्रांतिदलाचे कार्य उल्लेखनीय आहे. या दला-ने लक्ष्मण माने, पार्थ पोळके यांसारखे प्रभावी दलित कार्यकर्ते व लेखकही निर्माण झाले. या चळवळीतून डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांसारख्यांनी समाजपरिवर्तनाच्या नव्या वाटा शोधल्या. जातीयतेच्या कक्षेबाहेर शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक कार्य राखण्याचे ब्रीद या दलाने पाळले असे म्हणावे लागेल.

नेहरू युगानंतर घ्राष्ट्रीय स्वयंसेवक संघङ हा देखील विमुक्त जमातीच सेवाकार्यात सहभागी झाला. 'विश्व हिंदू परिषदेची' स्थाप-ना १९६६४ मध्ये झाली आणि तिच्या नंतरच्या काही अधिवेशनातून हिंदू धर्मांतराचा व अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न धार्मिक पातळीवर मिटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. १९८३ साली 'समरसता मंचाची' स्थापना करण्यात आली. या मंचातर्फे हिंदू समाजातील जाती-जमातीचे ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

महात्मा गांधींच्या जन्मशताब्दी वर्षात केंद्रीय शासनातर्फे 'राष्ट्रीय सेवा योजना' कार्यान्वित करण्यात आली. विद्यार्थ्यांना आपल्या परिसरातील समाजोपयोगी उपक्रमात सहभाग करून घेणे, समाजसेवेची वृत्ती व जबाबदारी त्यांच्यात निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. या कालखंडाचा प्रभाव वलयातच शरद जोशींच्या शेतकरी संघटनेचा उदय झाला (१९७९). महात्मा फुल्यां-नी '□लामा□री'ची देशी संकल्पना मांडली होती ; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'अधिकृत भारत' ही सं□ल्प-ना मांडली होती आणि शरद जोशींनी दोघांच्या संकल्पनांचा अर्थपूर्ण मेळ घालून 'इंडिया व भारत' ही द्वंद्वात्मक संकल्पना सिध्द केलेली आहे. मराठी शेतकरी वर्ग व त्या वर्गातील कवी, लेखक यांच्यावर शद जोशींचा प्रभाव पडलेला दिसून येतो. उपरोक्त विवेचनावरून १९६० ते १९८० या दोन दशकात परिवर्तनाच्या चळवळीचा एक टप्पा पूर्ण झालेला दिसतो. या कालखंडाच्या अखेरीस देशातील आणीबाणीचे एक पर्व घडून गेले. त्यातूनही एक मूलभूत चिंतन व्यक्त झालेले दिसते.

महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा वारसा बाबत आढावांनी कृतिशीलरित्या चालू ठेवलेला दिसतो. इंदिरा गांधींच्या युगानंतर काँग्रेस संस्कृतीचे विघटन होत गेलेले दिसते आणि बहुजनातील तिची विश्वसनीयता कमी झाली. शिवसे-ने-ने एक अभिजन-बहुजन संमिश्र असे संघटन घडवून आणले. ही संघटना मराठी माणसांच्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात कार्यरत असलेली दिसून येते.

अनूसूचित जातीच्या राजकारणात घ्दलित पँथरङ च्या उदयाने क्रांतिकारक असा बदल घडलेला दिसतो. घ्मागासवर्गीय जातीची लढावू संघटनाङ असे दलित पँथरचे वर्णन केले जाते. महाराष्ट्रातील पददलितांच्या नव्या जाणिवा व जागृती यांचे अभिव्यक्त रूप म्हणजे 'दलित पँथर' ही संघटना होतय.

दलित पँथरच्या सामाजिक योगदानाविषयी व.मं.शिरसीकर म्हणतात, " 'दलित पँथर'नी घोषित केलेली नवी प्रतीसंस्कृती (Counter Culture) ही संचलित राजकीय आणि सामाजिक प्रस्थापित व्यवस्थेच्या संपूर्ण विरोधी आहे. कुठल्याही प्रकारची तडजोड पँथर्सना मान्य नाही. सतत संघर्षात्मक भूमिका घेतल्यामुळे दलित पँथर्सना भरपूर पाठिंबा व सामर्थ्य लाभले. दलित साहित्य, नाट्यभूमी, लोकनाट्य आणि अन्य सांस्कृतिक क्षेत्रे प्रस्थापित करण्यात दलित पँथर्सला यश मिळाले."[२४] दलित साहित्याचे साहित्यिक हे दलित चळवळीचे कार्यकर्ते होते. दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांनी खदखदत अस□ारा आत्माविष्कार प्रस्थापित समाजासमोर मांडण्यासाठीच आपल्या होती लेखणी घेतलेली दिसते. 'दलित पँथर' या संघटनेमुळेच सांस्कृतिक क्षेत्रे अधिक व्यापक होताना दिसून येतात.

दलित साहित्याची सुरूवात झाल्यापासून एका तपानंतर म्हणजे १९७५ च्या आसपास ग्रामीण साहित्याची चळवळ उदयाला आली. महाराष्ट्रात वारंवार पडणारे दुष्काळ या दुष्काळामुळे शेतकरी, श्रमकरी आणि जनतेचे होणारे हाल ही गोष्ट महाराष्ट्राला नवी नव्हती. १९७२ साली पडलेल्या दुष्काळामुळे खेड्यांचे जीवन विस्कळीत झाले. यात सामान्य शेतकरी, कष्टकरी, छोटे छोटे उद्योग व व्यवसाय करणाऱ्या माणसांचे हाल होऊ लागले. शासनाकडून या काळात खडी केंद्र, रस्ते बांधणे, रस्ता दुरूस्ती, तलाव व कालवे बांधण्याची कामे काढून गरीब जनतेला जगवण्याचे प्रयत्न करण्यात येऊ लागले. शासनाच्या रोजगार हमी योजनेवरील कर्मचारी आणि मुकादम श्रमाचा मोबदला त्यांना देत नव्हते. कामाच्या ठिकाणी उघड्यावर संसार

थाटलेल्या कष्टकऱ्यांच्या बायकापोरींची अब्रू लुटण्यास ते मागेपुढे पाहत नव्हते. ग्रामीण भागातील दयनीय अवस्था साहित्यातून टिपण्याचे काम मात्र ग्रामीण तरूण लेखक करीत होता. ग्रामीण साहित्याचे लेखन करणाऱ्या नवोदित साहित्यिकांना एकत्र आणणचे कार्य आनंद यादव, रा. रं. बोराडे, चंद्रकुमार नलगे यांसारख्या लेखकांनी केले. महाविद्यायीन शिबिरे, चर्चासत्र, मेळावे घेऊन ग्रामीण साहित्याच्या चळवळीला सुरूवात झालेली दिसून येते. या चळवळीने ग्रामीण साहित्यिकांना आत्मविश्वास दिल्याने वर्तमान ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारे, वास्तवादी ग्रामीण साहित्य निर्मितीस गती प्राप्त झालेली दिसते. ग्रामीण माणसाची वंचना थांबवून, त्यांचे सर्व प्रकारचे शोषण थांबविण्याच्या प्रयोजनासाठीच ग्रामीण साहित्याची निर्मिती होताना दिसते.

सातव्या दशकात दलित साहित्याप्रमाणे स्त्री, मुस्लीम, आदिवासी या सामाजिक गटांच्याही चळवळी सुरू झाल्या. स्त्री मुक्तीच्या लाटा व साहित्यातील त्यांचे प्रतिनिध्वनी यांचेच पडसाद येथील सुशिक्षित स्त्री वर्गामध्ये उमटत गेले. कुमुद करकरे यांची 'स्त्रियांची चळवळ', श्रीमती छाया दातार यांचे 'स्त्री-पुरूष' सोडले, तर नाव घ्यावे असे पुस्तक निर्माण झाले नाही. तथापि महिला दक्षता, नारी समता, श्रमिक महिला मंडळे, बोलत्या व्हा असे अनेकविध सक्रिय गट अधिक क्रियाशील झालेले दिसतात. याशिवाय परंपरागत महिला मंडळे किंवा साहित्य परिषदेच्या शाखा आपापले विधायक कार्य करीत आहेत. शेतकरी संघटनेने स्त्री संघटनेला पाठिंबा देऊन स्त्री शक्ती संघटना संघटित करण्यास मदत केली आहे. मुंबईच्या महागाई विरूध्दात कृतिसमितीने श्रीमती मृणाल गोरे व अहिल्या रांगणेकर यांच्या नेतृत्वाखाली लढाऊ स्त्रियांना संघटित करून त्यांच्या हातातले लाटणे लढण्याचे प्रतीक बनविले. म्हणजेच स्त्रियांनी निर्माण केलेल्या चळवळीमुळे तत्कालीन समाजातील स्त्रियांमध्ये प्रचंड जागृती निर्माण झाल्याचे चित्र दिसते.

१९६० नंतर मराठी मुसलामानात सामाजिक बदल व्हायला सुरवात झाली. साठीच्या उत्तरार्धात मुंबईमधील काही मुसलमान संस्थांनी शहरातून शिक्षण संस्था उघडल्या. उर्दू माध्यमाचा प्रसार सुरू केला. १९६७ नंतर हमीद दलवाईंनी सत्यशोधक चळवळ सुरू केली. दलवाईंनी समान नागरी कायदा, तलाक बंदी, मराठी माध्यमाचा स्वीकार, मुल्ला मौलवींवर टीका यांचा घणाघाती प्रचार सुरू केला. महाराष्ट्रातील मुस्लीम परंपरावादी संघटना त्यामुळे खडबडून जाग्या झाल्या. इस्लामच्या अस्मितेचा प्रश्न उभा करून त्यांनी समान नागरी कायद्याला विरोध, मुस्लीम पर्सनल लॉचे पावित्र्य, उर्दू भाषेचा प्रश्न इ. गोष्टी उचलून धरण्यास सुरवात केली.

शेतकऱ्यांच्या चळवळीविषयी एन. डी. पाटील म्हणतात, ''महात्मा फुलेंचा ग्रंथ 'शेतकऱ्यांचा आसूड' शेतकऱ्याच्या चळवळींचे स्वरूप, तंत्र आणि तत्त्वज्ञान यांचे एक समग्र चिंतन होते. दुष्काळ, दारिद्रय, कर्जबाजारीपणा, शेतीची आधुनिक पध्दती, कालवे, पाणीपुरवठा, खार जमिनीचे प्रश्न, प्रगत अवजारे, शेतकऱ्यांचे अज्ञान, त्यापायी होणारे त्यांचे आर्थिक व सामाजिक शोषण यातील आंतरसंबंध लक्षात घेत त्यांनी समग्र शेतकरी चळवळ उभी केली.''[२५] शेतकऱ्यांच्या चळवळीची खरी प्रेरणा म्हणजे महात्मा फुले लिखित घ्शेतकऱ्यांचा आसूडङ हा ग्रंथ होय. हे उपरोक्त विवेचनावरून प्रत्ययास येते. शेकऱ्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देऊन त्यांना जागृत करण्याचे महान कार्य फुलेंनी केले. भट, ब्राह्मण, आणि इंग्रजांच्या शोषणातून शेतकऱ्यांनी आपली सुटका कशी करून घ्यावी, त्याचे मार्गदर्शन म्हणजे 'शेतकऱ्यांचा आसूड' महात्मा फुले यांच्या विचार आणि कार्याची प्रेरणा घेऊन आठव्या दशकातील शेतकरी संघटनेने शेतीमालाचे भाव, एक कलमी कार्यक्रम घेऊन चाकणचा हमरस्ता कांदा प्रश्नावर, निपाणीचा हमरस्ता तंबाखू प्रश्नावर, पिंपळगावचा हमरस्ता उसाच्या प्रश्नावर बंद करून शेतकऱ्यांची एकजूटता सर्व देशाला दाखवून दिली आहे. याच माध्यमातून शरद जोशी सर्व शेतकरी वर्गाचे नेते बनले. शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली एकत्रित आलेले शेतकरी विविध राजकीय पक्षांत विखुरलेले असल्याने त्यांचा एकत्रित राजकीय परिणाम अजूनही एक प्रभावी शेतकऱ्यांची चळवळ म्हणून जाणवलेला नाही.

शेतकऱ्यांच्या चळवळीच्या बाबतीत एन.डी.पाटील म्हणतात, "आजची शेतकरी संघर्ष चळवळ प्रचंड आव्हानांनी वेढलेली आहे. वाढते वीज दर, वीज मंडळाचे विभाजन, खतांचे, बियाणांचे, जंतुनाशकांचे वाढते भाव, सरकारच्या नाकर्तेपणामुळे येणारे दुष्काळाचे आवर्तन, ज्या लहान शेतकऱ्यांना शेती परवडत नाही त्यांनी शेतातून चालतं व्हावं, ही अन्नपुरवठा खात्याच्या सचिवाची घोषणा या सर्वांना तोंड देताना नवी शेतकरी संघर्ष चळवळ भ्रमांना गोंजारत न बसता, सोंगाला न भुलता धर्मनिरपेक्ष पक्ष-गट-तट विसरून सामर्थ्यशाली बनणे ही काळाची गरज आहे.''[२६] उपरोक्त विवेचनानुसार आलेल्या सर्व घटकांना कवेत घेऊन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, हितासाठी तळागाळातील घटकांना बरोबर घेऊन जाण्याचं सामर्थ्य असणारी शेतकरी चळवळ, न्यायाची चाड, अन्यायाची चीड, अन्यायाचे निर्दालन आणि सर्वांगीण न्यायी प्रस्थाना, शोषणमुक्त

समाज निर्माण करायचा असेल तर आज भाई एन.डी.पाटील यांच्या नेतृत्वाखाली भरभक्कम सहकार्याच्या सहाय्याने निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या संघटनेने, संख्येने आणि गुणवत्तेने समृध्द होत जाणारी ही शेतकरी संघर्ष चळवळ राज्यातील आव्हानांना तर सामर्थ्यपणे तोंड देईलच; पण राष्ट्रीय पातळीवर पूरक ठरू शकेल.

शेतकरी संघर्ष चळवळीप्रमाणे महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यावरणाच्या स्थित्यंतरात सहकार चळवळीचाही मोठा सहभाग असलेला दिसतो. सहकारी चळवळीचा आरंभ कसा झाला, त्याचा मुख्य उद्देश काय होता, त्याचाही येथे प्राधान्याने विचार करणे उचित ठरेल. भारतातील सहकार चळवळीची सुरूवात १९०४ च्या सहकारी संस्थाविषयक कायद्यांनी झाली. देशातील प्रांतात ज्या सहकार चळवळीने अल्पावधीतच मूळ धरले व जोमाने प्रगती केली, त्यामध्ये तत्कालीन मुंबई प्रांत अग्रेसर होता. त्याचे एक कारण म्हणजे येथील चळवळीस लाभलेले बिगर शासकीय नेतृत्व असल्याचे दिसते.

सहकार चळवळीमागील कारण शोधताना म. द. पाध्ये प्रतिपादन करतात, ''सहकार संस्थांची निर्मिती प्रामुख्याने समाजातील दुर्बलांच्या व गरिबांच्या हिताची जपणूक करून विकासाचे लाभ त्यांच्या पदरात पाडावे यासाठी करण्यात येते.''[२७] सहकार चळवळीच्या निर्मितीमागील मुख्य प्रयोजन उपरोक्त विवेचनावरून प्रत्ययास येते. समाजातील दुर्बल आणि गरिबांच्या हिताची जपणूक करणे हा सहकार चळवळीचा प्रधान हेतू असलेला दिसतो.

१९९४ मध्ये विद्यापीठाच्या नामांतराची समस्या अधिक उग्र झालेली दिसते. अनेक वर्षे वाट पाहून दलित समाजातील गौतम वाघमारे या युवकाने नांदेड येथे या दिरंगाईच्या निषेधार्थ आत्मदहन केले. रिपब्लिकन पक्षाच्या रामदास आठवले यांनी आपला मंत्रिपदाचा राजीनामा दिला. एप्रिल १९९४ पूर्वी नामांतर न झाल्यास तो स्वीकारावा असे आठवले यांनी नमूद केले होते. दि. १४ जानेवारी १९९४ या संक्रांतीच्या दिवशी नामविस्ताराची घोषणा शरद पवार यांनी केली आणि नवे नाव 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठावाडा विद्यापीठ' असे ठेवण्यात आले व ही दीर्घकालीन रेंगाळणारी समस्या संपली. मराठवाडयातील बहुजानांचा हा नामविस्तार मान्य नव्हता; पण शिवसेनेचा थोडाफार विरोध वगळता भा.ज.पा. सहित अन्य सर्व पक्षांनी या नामविस्ताराचे स्वागत केले.

फ□ष□र्ष :

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील काही घटना सांस्कृतिक पर्यावरणाच्या दृष्टीने अर्थपूर्ण ठरलेल्या दिसतात. पंढरपुरच्या विठ्ठल मंदिरीच्या आंदोलनाने दलितांना मंदिर प्रवेशास सहमती देण्यात आली. गांधी हत्येमुळे मराठा-ब्राह्मणांत संघर्ष विकोपाला गेला. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे खेडोपाडी असणाऱ्या दलितांवर अन्याय-अत्याचार वाढलेले दिसतात. मराठी साहित्याला अधिक व्यापक बनविण्यासाठी लघुनियतकालिक आणि नियतकालिकांची चळवळी उदयाला आलेली दिसते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मराठा समाज आणि साहित्यिकांचा समावेश असल्याकारणाने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघालेला होता. पंडित नेहरूंच्या निधनानंतर सांस्कृतिक पर्यावरणात आमूलाग्र परिवर्तन होत गेले. त्यात स्वयंसेवी चळवळींना चालना मिळाली. समाजवादी पक्षातर्फे जमीन बळकाव मोहीम, धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची चळवळ, एक गाव एक पानवठा, देवदासी पुनर्वसन, विद्यार्थी संघटना, शिवसेना, मुस्लीम सत्यशोधक संघटना, स्त्री मुक्ती, आंदोलने, युवक क्रांतिदल, अंधश्रध्दा निर्मूलन मोहीम, आदिवासींचे आंदोलन, शे.का.प. चळवळ, सहकारी चळवळ इत्यादी घटनांमुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मि□, शै□ि□□ क्षेत्रांत सांस्कृतिक परिवर्तन झालेले दिसते.

संदर्भ टीपा :

१. प्र. न. जोशी : 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', स्नेहवर्धन प्र□ाशन, पुणे, प्र. आ. १९९७, पृ. ५३
२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : 'वैदिक संस्कृतीचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८१, पृ. १९
३. प्र. न. जोशी : उनि, पृ. ५५
४. शं. दा. पेंडसे : 'महाराष्ट्रातील सांस्कृतिक इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, प्र.आ.१ मे २००१, (महाराष्ट्र दिन) पृ.२८
५. पु. □. सहस्त्रबुध्दे : 'महाराष्ट्र संस्कृती' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्र.आ.१९७१, पृ. ४

६. पु. □. सहस्त्रबुध्दे : तत्रैव, पृ. ४२
७. महादेवशास्त्री जोशी : 'भारतीय संस्कृती कोश', खंड पहिला, पृ. १०
८. रा. ग. जाधव : 'कला साहित्य आणि संस्कृती', सु□धा प्र□ाश-न, पु□, प्र. आ. १९८६, पृ. १
९. रा. ग. जाधव : तत्रैव, पृ. २
१०. रा. ग. जाधव : तत्रैव, पृ. २
११. सदा कऱ्हाडे : 'समाज आणि साहित्य', लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्र. आ. १९९५, पृ. ८
१२. सदा कऱ्हाडे : तत्रैव, पृ. ८
१३. रा. ग. जाधव : 'पर्यावरण संशोधन आणि साहित्य', स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे. प्र. आ. १९९६, -ृ. १८
१४. रा. ग. जाधव : तत्रैव, पृ. १८
१५. रा. ग. जाधव : तत्रैव, पृ. २०
१६. जनार्दन वाघमारे : 'साहित्य चिंतन', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९९, पृ.५२
१७. रा. ग. जाधव : 'मराठी वाङ्मयः स्वातंत्र्योत्तर संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९८, पृ.९
१८. रा. ग. जाधव : तत्रैव, पृ. १७
१९. रा. ग. जाधव : 'मराठी वाङ्मयः स्वातंत्र्योत्तर संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.१९९८, पृ.१९
२०. रा. ग. जाधव : 'मराठी वाङ्मयः स्वातंत्र्योत्तर संदर्भ', उनि, पृ.२६
२१. रा. ग. जाधव : तत्रैव, पृ. २७
२२. पन्नालाल सुरा□ा : आजचा महाराष्ट्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९८, पृ.१०
२३. रा. ग. जाधव : 'मराठी वाङ्मयः स्वातंत्र्योत्तर संदर्भड, उनि, पृ.२०
२४. व. मं. सिरसी□र : 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे प्र.आ.१, १ मे २००१ (महाराष्ट्र दिन), उनि, पृ.१२३
२५. एन. डी. पाटील : 'प्रा.एन.डी.पाटील : व्यक्तित्व आणि कर्तृत्व', उनि, पृ.५७
२६. एन. डी. पाटील : तत्रैव, पृ. ६१
२७. म. द. पाध्ये : 'महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचे यशापयश', श्रीविद्या प्र□ाश-न पु□. संपाद□ -पन्नालाल सुरा□ा - घ्आजचा महाराष्ट्र', प्र.आ.१९८८, पृ.२२

सी.डी.कांबळे
मराठी विभाग सी. बी. खेडगीज् कॉलेज अक्कलकोट , जि. सोलापूर.